REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# सविनय कायदेभंग चळवळीत सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग




**डॉ. एस. डी. खैरनार[१] , प्रा. ए. एन. वळवी[२]**
[१]इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती पुष्पाताई हिरे, कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय, मालेगाव कॅम्प (नाशिक)
[२]इतिहास विभाग प्रमुख, गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचेकला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगांव ता.जि.धुळे

## प्रस्तावना :-

इ.स.१९३० मध्ये साबरमती आश्रमात अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाची बैठक झाली. त्या बैठकीत भारतात सविनय कायदेभंग चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. या चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजीकडे सोपविण्यात आले. या चळवळीचे स्वरुप म्हणजे, मिठाचा सत्याग्रह, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षणाचा पुस्कार, दारु बंदी, कर बंदी, जंगल कायद्याचा भंग आणि सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार, न्यायालयावर, परकीय मालावर बहिष्कार इत्यादी तत्त्वांचा समावेश या चळवळीत करण्यात आलेला होता.

१२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधीजींची प्रसिध्द कायदेभंगाची चळवळ, दांडी यात्रेस प्रारंभ केला. या चळवळीत जनतेला मोठ्या प्रमाणात सहभाग होण्याची महात्मा गांधींजीनी हाक दिली. यामध्ये स्त्रियांनी महात्मा गांधीजींच्या हाकेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. त्या प्रत्यक्ष चळवळीत सहभागी झाल्या. तो क्षण स्त्री सेनेचा सर्वोत्तम क्षण होय. या दांडी यात्रेच्या लाटा सातारा जिल्ह्याच्या भूमीवरही येवून आदळू लागल्या. सविनय कायदेभंग चळवळीत सातारा जिल्ह्यातील स्त्रियांनी ही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतल्याचे आपणास विविध संदर्भ ग्रंथामधून आढळतो. भारतीय स्वातंत्र चळवळीत सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग फार मोठा आहे. स्वातंत्र प्राप्त करण्यासाठी झालेल्या विविध चळवळींमध्ये सहभागी झालेल्या स्त्रियांचा इतिहास समाजाला ज्ञात व्हावा. या हेतूने प्रस्तुत शोध निबंध लिहीण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

## उद्देश :

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभागाचा अभ्यास करणे.
२) स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचे कार्य समाजासमोर आणणे.

## गृहितके :

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग दिसून येतो.
२) स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचे कार्य मोठे आहे.

## संशोधन पध्दती :

प्रस्तूत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक, ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असून या सदर विषयाशी निगडीत शोध निबंधातील विवेचन दुय्यम स्त्रोतांवर अवलंबून आहे. यासाठी ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ, स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, देशभक्त कोश, वर्तमानपत्रातील लेख, मासिके यांचा आधार घेतला आहे.

## सविनय कायदेभंग चळवळीत सातारा जिल्ह्यातील स्त्रीयांचे योगदान :

### आपटे, सारजाबाई विनायक :-

देशभक्त आपटे सारजाबाई विनायक यांचे जन्मगाव सातारा, त्या प्रशिक्षित शिक्षक, १९३० च्या सविनय कायदेभंग चळचळीत. (मीठ, जंगल, सत्याग्रह, दारु, दुकानासमोर पिकेटींग, प्रभातफेरी) सहभाग घेतल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. तीन महिने साधी कैद व १०० रुपये दंड ठोठावण्यात आला, शासनाकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले.

### काटकर पार्वतीबाई दत्तात्रेय :-

देशभक्त काटकर पार्वतीबाई दत्तात्रेय त्यांचे मुळगाव मसूर ता. कराड, जि.सातारा, त्यांचे शिक्षण मराठी सातव्या इयत्तेपर्यंत तसेच ट्रेंड मिडवाईफ नर्स १९३०-३२ च्या कालावधीत झालेल्या कायदेभंगाच्या चळवळीत सहभाग घेतल्यामुळे त्यांना सहा महिने साधी शिक्षा व ५० रुपये दंड ठोठावण्यात आला.

### नाईक इंदुमती रामचंद्र :-

देशभक्त इदुंमती रामचंद्र नाईक यांचे वास्तव्य कराड (जि.सातारा) येथे होते. महात्मा गांधीजीनी सुरु केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी १९३०-३२ सालच्या दरम्यान सहभाग घेतला, त्या काही वर्षे अखिल भारतीय कॉग्रेसच्या सदस्या होत्या.

### पाटील गंगाबाई :-

देशभक्त पाटील गंगाबाई यांचा १८८५ साली कराड येथे जन्म झाला. सविनय कायदेभंग आंदोलनात त्यांनी १९३० साली कराड येथील गव्हर्नरला काळी निशाणे दाखवण्यात गेलेल्या स्वयंसेवकांचे पुढारीपणाचे नेतृत्व स्विकारल्याचे आढळून येते.

### होनराव सुशिला पांडूरंग :-

देशभक्त होनराव सुशिला पांडूरंग त्यांचा जन्म १९१० साली सातारा येथे झाला. त्यांचे शिक्षण ट्रेंड प्रायमरी टिचर पर्यत झाले. १९३० - ३२ सालच्या कायदेभंगाच्या चळवळीच्या दरम्यान त्यांनी सभा मिरणूकीत सहभाग घेतला. तसेच त्यांनी १९४२ सालच्या चलेजाव आंदोलनाच्या दरम्यान भूमिगत झालेल्या आंदोलनाचे कार्यकर्त्यांना सहाय्य व आश्रय दिला. ब्रिटिश सरकारच्या जुलमी राजवटीविरोधी त्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेवून त्यांनी ब्रिटिश सत्तेला विरोध करण्याचा प्रयत्न केला.

### जंगल सत्याग्रहातील स्त्रीयांचे योगदान :-

ब्रिटिश सरकारच्या अन्यायाच्याविरोधी १९३० मध्ये देशभर जंगल सत्याग्रह प्रारंभ करण्यात आला. जुलमी ब्रिटिश सरकारने इ.स. १९३० च्या दरम्यान आदिवासींचा जंगलवरील हक्क नाकारण्यात आला होता. जंगलातुन गवत, लाकूड गोळा करणे, फळे व वनौषधी गोळा करण्यावरही जाचक निर्बंध लादण्यात आले होते. गाई-म्हशीनांही जंगलात सोडण्यात पायबंद घालण्यात आलेला होता. इंग्रज सरकारच्या या अन्यायकारक धोरणाच्या विरोधात देशभर आंदोलन सुरु आले. १८ जुलै ते ५ सप्टेबर १९३० च्या दरम्यान सांगली जिल्ह्यातील, शिराळा तालुक्यातील बिळशी येथे देशातील पहिला जंगल सत्याग्रह झाला. यानंतर ठिकठिकाणी सर्वत्र जंगल सत्याग्रह सुरू झाले. या जंगल सत्याग्रहात सातारा जिल्ह्यातील स्त्रीयांचे मोठे योगदान असल्याचे आपणांस दिसून येते.

### देवकर येशाबाई गणपती :-

देशभक्त येशाबाई गणपती देवकर यांचे मुळगाव किरपे (ता.कराड जि.सातारा) १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत व जंगल सत्याग्रहात उत्स्फुर्तपणे सहभाग घेऊन ब्रिटीश सरकारच्या धोरणाविरोधी आवाज उठविला. त्यांनी पोलिसांकडून बंदुका काढुन घेतल्या. त्याबद्दल ब्रिटीश सरकारने त्यांना अटक केली. पुढे गांधी - आयार्विन कराराचा फायदा मिळून त्यांची सुटका झाली.

### जोशी रमाबाई नरहर :-

देशभक्त रमाबाई नरहर जोशी यांचा जन्म १९०५ मध्ये मसूर येथे झाला. (ता.कराड जि.सातारा) मराठी चौथ्या इयत्तेपर्यत त्यांचे शिक्षण; १९३० च्या कायदेभंग चळवळीच्या दरम्यान त्यांनी जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला. व त्या भूमिगत राहून ब्रिटिश सरकारला त्रास देण्याचा प्रयत्न केला. १९३१ साली खटला रद्द झाल्यानंतर त्या प्रगट झाल्या. इ.स. १९६६ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

**धोकटे पार्वती एकनाथ :-**

देशभक्त पार्वती एकनाथ धोकटे यांच्यावरही स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव पडलेला दिसतो. सातारा जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहात उत्स्फुर्तपणे सहभाग घेऊन ब्रिटिश सरकारच्या अन्याय कारक कायद्याला विरोध केल्याचे आढळते.

**तांबवे येथील जंगल सत्याग्रह :-**

तांबवे हे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एक गाव आहे. कोयना नदीच्या तीरावर तांबवे हे गाव वसले आहे. तांबवे हे गाव स्वातंत्र्य सैनिकांचे गाव म्हणुन ओळखले जाते. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात तांबवे या गावातील अनेक देशभक्तांनी आपल्या प्राणाची बाजी लावल्याचे दिसून येते. महात्मा गांधींनी १९३० मध्ये सविनय कायदेभंग आंदोलन हाती घेतले या आंदोलनाचा प्रभाव तांबवे या गावातील जनतेवरही मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. तांबवे या गावातील जंगल सत्याग्रहात मोठ्या प्रमाणात स्त्रियांनी ही सहभाग घेतल्याचे आढळून येते.

**बाबर चंद्राबाई अंतू :-**

देशभक्त चंद्राबाई अंतू बाबर यांचा जन्म १८९० झाली तांबवे (ता. कराड, जि. सातारा) या गावी झाला. १९३० साली महाराष्ट्रात ठिकठिकाणी जंगल सत्याग्रहात मोठ्या संख्येने स्त्रियांनी सहभाग घेतला व ब्रिटिश सरकार विरोधी कायदेभंग आंदोलन सुरु केले. त्याचा प्रभाव सातारा जिल्ह्यातील तांबवे या गावावर पडलेला दिसून येतो. देशभक्त चंद्राबाई अंतू बाबर यांनी तांबवे येथील जंगल सत्याग्रहात सहभागी झाल्या व अत्याचारी पोलिसांच्या बंदुका काढण्याचे कार्यात सहभाग घेतला. त्यांच्या या कार्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना अटक केली. तथापि सात महिन्यांनी गांधी - आयार्विन कराराचा फायदा मिळुन त्यांची सुटका झाली. १९५० साली त्यांचा मृत्यु झाला. तांबवे येथील जंगल सत्याग्रहात व अत्याचारी पोलिसांच्या बंदुका काढण्याचे कार्यात देशभक्त तानुबाई हरीबा बाबर, मुळगाव तांबवे, भागुबाई मारुती बाबर, मुळगांव तांबवे, रखमाबाई अंतू बाबर, मुळगाव तांबवे, या देशभक्त स्त्रियांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेवून ब्रिटिश सरकारच्या धोरणाविरोधी आवाज उठविल्याचे दिसून येते.

**राऊत कासाबाई भाऊ :-**

देशभक्त कासाबाई भाऊ राऊत यांचा जन्म १८९० साली तांबवे (ता.कराड जि.सातारा) या गावी झाला. १९३० सालच्या सविनय कायदेभंग चळवळीच्या दरम्यान त्यांनी जंगल सत्याग्रहास सहभाग घेतला. यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना सहा महिने सक्त मजूरी व १०० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. असे असले तरी, १९३२ साली पुन्हा त्यांनी सभा मिरवणुकीत सहभाग घेतल्याने इंग्रज सरकारने त्यांना पुन्हा सहा महिने सक्तमजूरी व १५० रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली.

**निष्कर्ष :-**

महात्मा गांधीजीनी १९३० मध्ये सुरु केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत भारतीय महिलांनी अलौकिक कामगीरी केली. त्यात सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग आपणांस दिसून येतो. महात्मा गांधींनी स्वातंत्र चळवळीत सहभागी होण्यास सांगितले. त्यांच्या या हाकेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. देशाच्या वेगवेगळया भागातून स्त्रियांनी उस्फूर्तपणे स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला. सविनय कायदेभंग चळवळीत सातारा जिल्हातील स्त्रियांनी ठिकठिकाणी मीठ, जंगल सत्याग्रह दारुच्या दुकानांसमोर पिकेटींग, प्रभात फेरी, भाषणे यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. भारतीय स्त्रियांमधील स्वातंत्र्याची आकांक्षा अशा निर्भय रीतीने प्रकट झालेली पाहून बिटिश साम्राज्यवाद्यांचे मस्तक भडकून उठले. त्यांनी अनेक स्त्री सत्याग्रहींना दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावल्या. परंतु या निर्भय स्वातंत्र्यसैनिकांची मने कधी खचली नाहीत. सविनय कायदेभंगाच्या सत्याग्रहाने भारताला निर्भय बनवले. वर्षानुवर्ष घराच्या उंबरठ्याबाहेर न पडणाऱ्या स्त्रिया निर्भय बनुन जुलमी इंग्रज सरकारशी सामना द्यायला रणांगणात उतरल्या. स्त्रियांच्या या पराक्रमाने समाजात स्त्रियांनमध्ये निश्चितच प्रेरणा निर्माण होईल. त्यांच्यात आत्मविश्वास जागृत होईल असे संशोधकास वाटते.

**संदर्भ ग्रंथ -**

१) डॉ.कुटे भ.ग. - स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य पश्चिम विभाग खंड ३ (कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली व सोलापूर जिल्हे)

प्रकाशक: कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई - १९८०
२) वाळिंबे वि.स.- सत्तावन्न ते सत्तेचाळीस (स्वातंत्र्य लढ्यांची संस्मरणीय कहाणी)
प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे -१९९८.
३) पाटणे संभाजीराव - स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा .
प्रकाशक : ऑगस्ट क्रांती सुवर्णमहोत्सव समिती, सातारा.
४) जोशी प्र.न.- भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास.
प्रकाशक : स्नेहवर्धन पब्किशिंग हाऊस पुणे. व्दितीयावृत्ती १९९७.
५) पवार बा.ग. - क्रांतिसिंह नाना पाटील - प्रतिसकरकारचा रोमांचकारी इतिहास
प्रकाशक : मातृभूमी प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती -२००१.
६) शहासने चंद्रकांत - देशभक्त कोश
प्रकाशक : बहुजन सहित्यधारा, पुणे दुसरी आवृत्ती २ आक्टोबर २०१२.
७) डॉ.पाटील वा.भा - संशोधन पध्दती -
प्रकाशक : प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, प्रथमावृत्ती २००६.
८) मोदी नवाझ ब. (संपादक), फडके वासंती (अनुवाद) भारतीय स्वातत्र्यलढ्यातील स्त्रिया
प्रकाशक : मेहता पाब्लिशिन हाऊस पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी २००३.
९) K'. Sagar, Dr.T.M.Joseph (Translated by) History of Moders India १७५७-२००४ K'. Sagar, Publications - First Edition - २००७.
१०) Jaiswal Pradip - Research Methodology in History Omega Publications New Delhi First Published २००८.
११) प्रा. लेफटनंट सुनिता बोर्डे, खडसे प्रा.संतोष केशव खडसे - ऐतिहासिक परिप्रेक्षयातील स्त्रिया (इ.स.१८००-१९८४)
प्रकाशक : शुभम पब्लिकेशन्स पुणे प्रथमावृत्ती १ जाने २०१०.
१२) खोबरेकर वि.गो - इंग्रजी सत्तेविरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव १८१८-१८६०
प्रकाशक : पॉप्युलर बुक डेपो मुंबई १९५९.
१३) आचार्य जावळेकर शं. द.-आधुनिक भारत
प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे आवृत्ती पाचवी १९९४.
१४) पाठक ए. एस. (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटीयर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९
१५) पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य, संग्रामातील सातारा जिल्हा,
भि.दा.भिलारे गुरुजी, संयोजक ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, सातारा, १९९२.
१६) गुप्ता, विश्व प्रकाश एवं मोहिनी गुप्ता, - स्वतंन्त्रता संग्राम और महिलाएँ,
प्रकाशक : नयन प्रकाशन, नई दिल्ली, १९९९ ई.
१७) नागोरी एस.एल., श्रीमती कान्ता नागोरी, - स्वतंन्त्रता सेनानी कोश (गांधीयुगीन)
प्रकाशक : गीतांजली प्रकाशन, जयपूर, संस्करण प्रथम, २०११.